Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

37.

# कामशास्त्र आणि नाट्यशास्त्रातील नायिका

प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के
संशोधन मार्गदर्शक,
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर जि. नांदेड

**प्रस्तावना** . मानवजातीत अनेक प्रकारचे व्यक्ती आपल्याला भेटतात. त्यात रंग, वर्ण, कर्म व व्यवसायानुसार व्यक्ती व त्याच्या प्रवृत्ती बदलत असतात आणि हे बदल तसे क्रमविकासात अपेक्षितच असतात. कामशास्त्रकारांनी जे नायक व नायिका भेद सांगितलेले आहेत ते वस्तुस्थितीवर आधारीत, कांही तात्कालीन परिस्थितीवर तर काही भावनेवर, अवस्थेवर, कांही अनुमान व अनुभवावर आधारलेले आहेत.

वास्तविक जीवनात आपल्याला अनेक स्त्री व पुरुष भेटतात त्यांचे वर्गीकरण करीत आपण बसत नाही; परंतु त्यांचे वर्गीकरण केल्या जाऊ शकते.हे आपल्या निरिक्षणावरही तितकेच अवलंबून आहे. व ते मनाला पटायलाही लागते. आज आधुनिक जीवन प्रचंड गतिमान झालेले असून नवसाहित्याच्या अनुषंगाने विचार केल्यास हे साहित्य वास्तवतेकडे वळलेले दिसून येते. त्यामुळे यात आलेले हे भेद अर्थहीन वाटू शकतात. कामशास्त्र व नाट्यशास्त्रात असलेल्या नायिका अर्थात स्त्री दर्शनाचा अभ्यास करणे हा या शोध निबंधाचा हेतू आहे.

### नायिका भेद

### तत्र नायिकास्तिस्त्र:कन्या पुनर्भूर्वेश्या च इति

कन्या, पुनर्भू व वेश्या असे नायिकांचे तीन भेद वात्सायनाने सांगितलेले आहेत. [१] तसे प्रत्यक्ष नायिका म्हणजे काय याची व्याख्या केलेली नाही. तसे सहसा आढळत ही नाही. वरील तीन भेद म्हणजे पत्नी, उपपत्नी, संभोग्या व वेश्या या सर्व संज्ञांचा वापर त्यांनी उपभोग्या स्त्री या एकातच केलेला आहे. पुढे त्यांच्या शारीरिक गुण व लिंग भेदावर त्यांची नावे वेगवेगळी दिलेली आहेत. ती 'साम्प्रयोगिक अधिकरणात' येतात. शश, वृष व अश्व असे नायकांचे तर मृगी, वडवा व हस्तिनी असे नायिकांचे भेद सांगितले आहेत. तर रतिरहस्य, अनंगरंग, पंचसायक इ. कामशास्त्रात पद्मिनी, चित्रिणी, शंखिनी व हस्तिनी असे चार भेद सांगितले आहेत. वात्सायनाच्या कामसूत्राव्यतिरिक्त लक्षणानुसार नायिकांचे प्रकार अनेक साहित्यात विशेषत: नाट्यशास्त्रात सांगितलेले आहेत. ते पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. स्वकीया | २. परकीया | ३.सामान्या |
| ४. पद्मिनी | ५. चित्रिणी | ६. शंखिनी |
| ७. हस्तिनी | ८. ज्ञातयौवना | ९.मध्यमा |
| १०. प्रौढा | ११. मुग्धा | १२नवलअनंगमुग्धा |
| १३. लज्जाप्रिया मुग्धा | | १४.आवरुढयौवना |
| १५. प्रगल्भवचना मध्या | | १६.प्रादुर्भूतमनोभवा |
| १७.सुरतविचित्रा मध्या | | १८.समस्तरसकोविदाप्रौढा |
| १९. विचित्रविभ्रमा | | २०.आक्रमिता प्रौढा |
| २१. लुब्धापति प्रौढा | | २२. धीरा |
| २३. धीराधीरा | | २४.स्वाधीनपतिका२५. उत्कण्ठिता |
| | | २६. कलहांतरिता २७. खंडिता |
| | | २८. प्रोषित पतिका |
| २९. स्वयंदूतिका | | ३०. समस्या वन्धु |
| ३१. लक्षिता | | ३२. कुलटा |
| ३३. मुदिता | | ३४. अनुशयना |
| ३५. अनुढा | | ३६. लघुमानवती |
| ३७. मध्यमानवती | | ३८. गुरुमानवती |
| ३९. अन्यसंभोगदु:खिनी | | ४०. गर्विता |
| ४१. रुपगर्विता | | ४२. प्रेमगर्विता |
| ४३. कामगर्विता | | ४४. उत्तमा |
| ४५. मध्यमा | | ४६. दिव्या |
| ४७. दिव्यादिव्या | | ४८. अदिव्य |
| ४९. क्रिया विदग्धा | | ५०. वचनविदग्धा |
| ५१. कनिष्ठा | | |

नायिकेची साहित्यातील नावे पाहिल्या नंतर प्रत्यक्षात शास्त्रकारांनी नायिकेची लक्षणानुसार केलेली वर्गवारी जी त्यांच्या शारीरिक व मानसिक लक्षणावर केलेली दिसते. ही वर्गवारी वेगवेगळ्या ग्रंथात वेगवेगळ्या शास्त्रकारांनी दिलेली असून त्यातील भेदातही बरेच अंतर आहे. त्यातही काहींनी तीन तर कांहीनी चार नायिका सांगितल्या आहेत.

### आष्टांग नायिका

भारतीय कामशास्त्र, नाट्यशास्त्र व साहित्यशास्त्रात नायिकेचे अनेक भेद सांगण्यात आलेले आहेत. सर्वसामान्यपणे नायिकेच्या आठ अवस्था किंवा प्रकार सांगता येतात. जसे लक्षणानुसार, कर्मानुसार, देशानुसार, गुणानुसार, वेळेनुसार, प्रकृतीनुसार, सत्वानुसार व वयोमानानुसार ई.

### लक्षणानुसार नायिका .

पद्मिनी, चित्रिणी, शंखिनी आणि हस्तिनी

**कर्मानुसार नायिका**

स्वकीया, परकीया आणि सामान्या. [२]

**देशानुसार नायिका**

भारतातील विविधप्रांत अथवा विशिष्ठ शहरानुसार नायिकेचे लक्षण सांगण्यात आलेले असून त्यांना देशानुसार नायिका असे वर्गीकरण करण्यात आलेले आहे आणि त्यांच्या कामाचाराचे लक्षण दिलेले आहेत.

१. **मध्यदेश नायिका** [३]
२. **मालवदेश नायिका** [४,५]
३. **आभीरदेश नायिका**[६,७]
४. **कर्नाटकदेश नायिका** [८,९,१०]
५. **आन्ध्रादेश नायिका**[११,१२]
६. **महाराष्ट्र देश नायिका** [१३,१४]
७. **कामरुप (आसाम) नायिका** [१५]
८. **सिंधूदेश नायिका** [१६]
९. **गुजरातदेश नायिका** [१७]
१०. **स्त्रीराज्यदेश नायिका** [१८]

(स्त्रीराज्य म्हणजे भुतान व वर्तमान स्थितीतील अरुणाचल, मेघालय, नागालॅंड, मणीपुर, मिझोरम इ. क्षेत्र येतात जिथे स्त्रिया ह्याच अधिकारीणी व पुरुषावर शासन करणाऱ्या आहेत. तर कांही विद्वान स्त्री राज्य हे भारताचा पश्चिमोत्तर भाग मानतात.)

**गुणानुसार नायिका**

उत्तमा,मध्यमा आणि अधमा.

पहिल्यांदा ही संकल्पना भरताने नाट्यशास्त्रात दिलेली असून त्यानी स्त्री व पुरुषांचे वर्गीकरण करतांना उत्तमा, मध्यमा आणि अधमा असे सांगितले आहे. [१९] रसमंजरीत भानुभट्टाने या ज्ञांच्या व्याख्या नायिकेच्या अनुषंगाने देताना म्हटले आहे. "प्रियकराने अपराध केला असतानाही अनुग्रहपर असते ती उत्तमा; प्रियकराच्या अनुकूल वा प्रतिकूल भावनांच्या अनुरंधाने वर्तते ती मध्यमा; प्रियकर अनुकूल असला तरी त्याच्याशी प्रतिकूल असते ती अधमा होय."

रुद्रभट्टाने श्रृङ्गारतिलक या ग्रंथात संज्ञांची व्याख्यावजा वर्णने दिलेली आहेत. " जिचा रोष प्रियकराच्या दोषाशी अनुरुप असतो व जी अनुनयाने प्रसन्न होते, ती उत्तमा; अपराध अल्प असूनही जिचा कोप बेभान असतो व जिच्या सांत्वनासाठी फार कष्ट करावे लागतात ती मध्यमा; जी निष्कारण कृध्द होते व मनधरणीवाचून खुष होते, जिच्या प्रवृत्ती निर्हेतुक असतात व चित्त चंचल असते ती अधमा."

शृंगारमंजरीत," प्रियकरापेक्षा जिच्या प्रीतीची उत्कटता अधिक असते, ती उत्तमा; प्रियकराच्या प्रीतीच्या प्रमाणात प्रतिक्रिया प्रकट करते, ती मध्यमा; प्रियकराविषयी जिच्या स्नेहात न्युनभाव असतो, ती अधमा." [२०]

**काळानुसार नायिका**

नायिकेचे काळानुरुप भावनिक अवस्थेनुसार आठ प्रकार कल्पिले आहेत. हे आठ प्रकार कोणत्याही नायिकेला केंव्हाही लागू होऊ शकतात अर्थात सर्व अवस्था एकाच नायिकेच्या ठायी वेगवेगळ्या प्रसंगी संभवणे शक्य आहे.संस्कृत साहित्यात विख्यात असलेल्या अष्टनायिकांचा संकेत भरताने नाट्यशास्त्रात मांडला आहे. तो असा :

**तत्र वासकसज्जा वा विरहोत्कण्ठितापि वा ।**
**स्वाधीनपतिका वापि कलहान्तरितापि वा ॥**
**खण्डिता विप्रलब्धा वा तथा प्रोषितभर्तुका ।**
**तथाभिसारिका चैव इत्यष्टौ नायिका: स्मृता: ॥**

पती आधीन असते ती स्वाधीनपतिका / स्वाधीनभर्तृका. प्रियकर प्रवासी असतो ती प्रोषिता / प्रोषितपतिका / प्रोषितभर्तृका. प्रियकराच्या स्वागतासाठी सज्ज असते ती वासकसज्जा / वासकसज्जिका. प्रियकराच्या विरहामुळे व्याकूळ असते ती उत्का / विरहोत्कण्ठिता. प्रियकराच्या प्रेमापराधामुळे क्षुब्द झालेली ती खण्डिता. प्रियकराशी कलह केल्याबद्दल पश्चात्तापाने व्याकूळ झालेली ती कलहान्तरिता. संकेत स्थानी प्रियकराच्या भेटीला जाते ती अभिसारीका. संकेतस्थानी प्रियकर न आल्याने व्याकूळ झालेली ती विप्रलब्धा. [२१]

**वयोमानानुसार**

मुग्धा, मध्यमा. प्रगल्भा [२२]

**मुग्धा**

मुग्धा नायिका म्हणजे जी तरुण्यावस्थेकडे वाटचाल करते आहे अशी नववधु होय.

**मध्यमा**

मध्यमा ही थोडी लज्जाहीन असते. म्हणजे निर्लज्ज नसून मुग्धा नायिकेच्या तुलनेत कमी लाजते. मधुर बोलते, जीची मुद्रा प्रसन्न दिसते ती 'मध्यमा' होय.

**प्रगल्भा**

लाजाळू स्वभाव सोडून सहज रतिक्रीडेत आनंदाने सहभाग घेणारी, सुंदर हास्य असणारी व अलंकारांचे ध्वनी करत शृंगारिक वातावरण तयार करणारी 'प्रगल्भा' किंवा 'प्रौढा' नायिका म्हणतात.

प्रौढदेवराज महाराजांच्या मतानुसार, "श्लथा म्हणजे कृष्णरंगी, तसेच 'घना' म्हणजे, जाड

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

गौरवर्ण, बुटकी, दिवसभर फिरणारी, उंच बाहू असणारी नायिका तर 'मध्या' म्हणजे श्लशा व घना यांचे संमिश्रण असणारी किंवा दोन्हीच्या लक्षणाची मध्यमता साधणारी मध्या होय. या तीनही नायिकांचे वयोमानानुसार सात अवस्था आहेत. ज्यानुसार आठ वर्षाची स्त्री कन्या, नऊ वर्षाची रोहीणी, दहा वर्षाची गौरी, दहा ते एकोणीस वर्षाची बाला, त्यानंतर तीस वर्षा पर्यंतची तरुणी आणि पन्नास वर्ष पर्यंत प्रौढा म्हणतात. त्यानंतर वृध्दा होय. [२३] या वयोमानानुसार सात वेगळ्या अवस्था पहावयास मिळतात.

तसे पहाता प्रेमाचा अंकुर पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांच्या हृदयात सर्वात पहिले निर्माण होतो असे म्हणतात. लज्जाहोमात स्त्री नेहमी असल्यामुळे ती आपल्या भावना सहज प्रकट करु शकत नसेल किंवा साऱ्या घटना ती नजर अंदाज करीत असेल. नाहीतरी भारतीय शास्त्रात नायिकारब्धशृंगार हा सर्व श्रेष्ठ मानला गेला आहे. नायिकारब्धशृंगार म्हणजे नायिकेच्या हृदयात पहिले रतिभाव जागृत होणे, प्रेम जागृत होणे, [२४] भारतीय नायकाच्या प्रेमकथेत पार्वती शंकरासाठी तपश्चर्या करते, रुक्मीनी श्रीकृष्णाला प्रेम संदेश पाठविते तर सावित्री सत्यवान मिळावा यासाठी प्रयत्नशील असते. शकुतला दुष्यंता साठी व्याकुळ होते. याविरुध्द इतर जागतिक कथा पाहिल्या असता नायक नायिकेसाठी प्रयत्नशील दिसतात. के.एम. पन्निकर म्हणतात," एका नायिकेच्या सर्व प्रियकरापैकी तोच तिचा प्रियकर होऊ शकतो. ज्याच्यात तिला आवडतील असे गुण असतील आणि असाच पती तिच्यावर श्रेष्ठत्वाचा आनंद घेऊ शकतो. कारण तोच तिच्या प्रेमाचा पती असतो " [२५]

सारांश रुपाने असे म्हणता येईल की, नायिकेची ही लक्षणे पाहिल्यानंतर प्रत्यक्षातही या साऱ्याच नायिका त्यांच्या लक्षणावरुन ज्ञात होऊ शकतात आणि या साऱ्याचा परिपाक म्हणजे परस्पर उपयुक्ततेच्या आधारावर व्यक्ती रतिसुखाला सहज प्राप्त करु शकतो.

**संदर्भ—**

१. कुलकर्णी, दत्ता जी., अनु; संपुर्ण कामसूत्र (१/५/३), राजेश प्रकाशन, पुणे. पृ. २६
२. डॉ. चौहान दलवीर सिंह, अनु; शृंगाररसप्रबंधदीपिका (१/३२—३७) चौ.प्रेस, वाराणसी २००६ पृ. २६—२८
३. झा, पंडीत रामचंद्र, अनु; अनंगरंग (५/१), चौ. प्रेस वाराणसी, वि. सं. २०५६ पृ.४३
४. डॉ. चौहान दलविर सिंह, संपा; रतिकल्लोलीनी (६३), चौ.सं.सी. ऑफिस, वाराणसी २००४, पृ. २८
५. शास्त्री रामचंद, अनु; वात्सायन का कामसूत्र (२/५/२४) मनोज पब्लीकेशन्स दिल्ली, २००४. पृ. १०६
६. डॉ. शर्मा रामानंद, व्याख्या; रतिरहस्यम् (५/१०), कृष्णादास अकादमी वाराणसी, वि.स. २०५१ पृ. ७५
७. शास्त्री रामचंद्र, पूर्वोक्त, (२/५/२४), पृ. १०६
८. डॉ. शर्मा रामानंद, टिका; पंचसायक (२/३४), कृष्णादास अकादमी वाराणसी, वि.सं. २०५१ पृ. २८.
९. डॉ. त्रिपाठी रामसागर, संपा; नागरसर्वस्वम (२०/७), चौ.सं. प्रतिष्ठाण, दिल्ली, २००४, पृ. ८५
१०. डॉ. चौहान दलवीर सिंह, अनु;स्मरदीपिका (१२४), चौ.प्रेस वाराणसी २००४ पृ. ५१
११. डॉ. शर्मा रामानंद, टिका; पचसायक (२/३०), कृष्णादास अकादमी वाराणसी, वि.सं. २०५१ पृ. २६—२७.
१२. शास्त्री रामचंद, पूर्वोक्त, (२/५/२८) पृ. १०६
१३. डॉ त्रिपाठी . रामसागर, संपा: नागरसर्वस्वम (२०/८), चौ.स. प्रतिष्ठाण, दिल्ली,२००४, पृ. ८५
१४. शर्मा वासूदेव, अनु; रंगेल रतिशास्त्र, नवजीवन प्रकाशन, पुणे, १९७२, पृ. ५९
१५. झा रामचंद्र, अनु; अनंगरंग (५/१०), चौ.प्रेस वाराणसी, वि. सं. २०५६ पृ.४५
१६. डॉ. शर्मा रामानंद, व्याख्या; रतिरहस्यम (५/११), कृष्णादास अकादमी वाराणसी, वि.स. २०५१ पृ. ७६; रामचंद्र शास्त्री, अनु; वात्सायन का कामसूत्र (२/५/२५) मनोज पब्लीकेशन्स दिल्ली, २००४. पृ. १०६
१७. शर्मा वासूदेव, अनु; पूर्वोक्त, पृ. ५८
१८. डॉ. त्रिपाठी रामसागर, पूर्वोक्त, (२०/६), पृ. ८४
१९. Raj Ram Kumar, Encyclopedia of Indian Erotics, Prachya Prakashan, Varanasi, 1983 p. 144-145
२०. जोगळेकर, स.अ., शृंगारनायिका, दलाल आर्ट स्टुडिओ, मुंबई, १९५५, पृ. १९,२०
२१. जोगळेकर, स.अ., शृंगारनायिका, दलाल आर्ट स्टुडिओ, मुंबई, १९५५, पृ. ४१
२२. डॉ. चौहान दलवीर सिंह, पूर्वोक्त, (१/११—२०) पृ. १३—२०
२३. वैद्य शास्त्री शंकर दत्त, अनु. रतिरत्नप्रदीपिका (२/३९—४१) कृष्णादास अकादमी वाराणसी,२००२ पृ.१९,२०
२४. डॉ.शर्मा रामानंद, भारतीय काव्यशास्त्र, विनोद पुस्तक मंदीर, आग्रा, १९८३, पृ. २४३
२५. Lonnoy Richard, The speaking tree, London Oxford University press, Newyork, 1971, p. 120

□□□